<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ७३/२०२६.</u>
<u>सुमन उत्तम चव्हाण व ईतर वि. निरंक</u>
<u>CNR No : MHBI130003112026.</u>

<u>:: निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश ::</u>

प्रस्तुतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार क्र. १ यांचे पती आणि अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे **उत्तम पि. पुराजी चव्हाण** हे दिनांक १८/०६/२०१० रोजी मयत झाले आहेत. तसेच मयत **उत्तम पि. पुराजी चव्हाण** याची आई ही देखील पूर्वीच मयत झालेली आहे. मयत **उत्तम पि. पुराजी चव्हाण** यांना अर्जदारांशिवाय ईतर कोणीही वारस नाही. अर्जदारांना विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयात दाखल करण्यासाठी कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

**०३.** प्रकरणात आदेश पारीत करून दिनांक ०८/०२/२०२६ रोजीचे दैनिक **"महाराष्ट्र प्रतिमा"** या वर्तमानपत्रात सदर प्रकरणाबाबत जनतेस जाहीर नोटीस बजाविण्यात आले. त्या वर्तमानपत्राची आवृत्ती नि. १३ वर अभिलेखावर दाखल आहे.

**०४.** अर्जदार क्र. २ **अनिल पि. उत्तम चव्हाण** यांनी त्यांचा पुरावा निशाणी क्र. १४ प्रमाणे अभिलेखावर दाखल केला आहे. अर्जदारांची पुरावा संपल्याची पुरसीस निशाणी क्र. १८ वर आहे. अर्जदार हेच मयत **उत्तम पि. पुराजी चव्हाण** यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदारांनी मृतक **उत्तम पि. पुराजी चव्हाण** यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र. १७ वर, स्वयंघोषीत कुटूंब मर्यादा प्रमाणपत्र नि.क्र. ०५ वर व अर्जदार यांचे आधार कार्ड च्या प्रती नि.क्र. ०६ ते ०९ वर दाखल केल्या आहेत.

**०५.** जनतेस जाहीर नोटीस देवुन सुध्दा आजपावेतो वारसप्रमाणपत्र देण्याबाबत कोणतेच आक्षेप न्यायालयास प्राप्त झाले नाही. म्हणुन अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरून अर्जदार हेच मृतकाचे वारस असल्याचे दिसुन येते. म्हणुन खालील आदेश पारीत.

**:: आदेश ::**

**०१.** अर्ज मंजुर.

**०२.** न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ मधील अपेन्डीक्स-बी प्रमाणे **अर्जदार क्र. ०१. सुमन भ्र. उत्तम चव्हाण, ०२. अनिल पि. उत्तम चव्हाण, ०३. अच्यूत पि. उत्तमराव चव्हाण, ०४. राहुल पि. उत्तमराव चव्हाण** यांना मयत **उत्तम पि. पुराजी चव्हाण** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

**०३.** बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम ८ अन्वये दिल्या जाणा-या प्रमाणपत्रासोबत दिवाणी नियमावली परिच्छेद ३१२ मध्ये दिलेल्या सुचना जोडाव्यात.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DIPAK RUSTUMRAO BORDE
Date: 2026.05.05 11:29:16 +0530

दिनांक – ०५/०५/२०२६.
ठिकाण - परळी वैजनाथ.

**( दिपक रु. बोर्डे )**
दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)
परळी वैजनाथ